सत्र खटला क्र. २/२०२४
निशाणी क्र.१६
महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. घाटंजी
..वि..
राजेश रामचंद्र अग्रवाल

**उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. पी.साबळे यांचे मार्फत सुरु –**

९. अन्न सुरक्षा मानके कायद्या अंतर्गत अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्याचा पोलीसांना अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणामध्ये ज्या पदार्थांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे, तो माझ्यासमक्ष जप्त करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला जे दस्तऐवज दिले तसेच अन्न पदार्थांचा साठा दाखविला, त्यावर विश्वास ठेवून मी माझी कैफियत पोलीस स्टेशनला दिली. अन्न सुरक्षा मानके कायद्या अंतर्गत पोलीसांना कैफियत देण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांना कैफियत देण्याचा अधिकार देण्याचा अधिकार नसल्यामुळे पोलीसांनी मला कैफियत देण्याकरीता बोलाविले व त्यामुळे मी पोलीस स्टेशनला जावून कैफियत दिली. मला पोलीस स्टेशनला फिर्याद देण्याचा अधिकार आहे.

**प्रश्न–** तुम्ही आतापर्यंत किती अन्न पदार्थांचा साठा दुकानामधून जप्त केला ?
**उत्तर–** प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला व त्यानूसार कैफियत दिली.
**प्रश्न–** तुम्ही आतापर्यंत अन्न पदार्थांचा साठा दुकानामधून जप्त केला नाही ?
**उत्तर–** जप्त केलेला आहे.

१०. मी अंदाजे ५० दुकानांमधून अन्न पदार्थाचा साठा जप्त केलेला आहे. अन्न सुरक्षा मानके कायद्या अंतर्गत अन्न पदार्थाबाबत मी न्यायालयामध्ये अंदाजे १० प्रकरणे दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की अन्न सुरक्षा मानके कायद्या अंतर्गत मला पोलीस स्टेशनला कैफियत देण्याचा अधिकार नाही.

११. नियमाप्रमाणे एका अन्न पदार्थाचे चार भाग नमूणे म्हणून मी घेत असतो.
**प्रश्न–** एखादा अन्न पदार्थ प्रतिबंधित आहे किंवा नाही हे तुम्ही स्वतः ठरवू शकत नाही ?

**उत्तर–** प्रतिबंधित अन्न पदार्थावरील लेबलवरुन मी ठरवू शकतो.

हे म्हणणे खरे आहे की अन्न पदार्थावरील लेबलवरुन तो अन्न पदार्थ प्रतिबंधित आहे किंवा नाही हे अन्न सुरक्षा अधिका–याला म्हणजे मला ठरवण्याची तरतूद कायद्यामध्ये नाही.

१२. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणातील अन्न पदार्थ प्रतिबंधित आहे असे समजून मी माझी कैफियत दिली. हे म्हणणे खरे आहे की सदर साठ्याबाबत पोलीस अधिकारी श्री. निलेश सुरडकर यांनी आरोपीस विचारणा केली असता आरोपीने सदर साठा हा त्याच्या मालकीचा असून विक्रीकरीता दुकानामध्ये साठविला आहे, याबाबत मी कोणत्याही दस्तऐवजामध्ये तसेच माझ्या बयानामध्ये मी नमूद केलेले नाही. कोणत्याही दस्तऐवजामध्ये किंवा माइया बयानामध्ये ही बाब नमूद केलेली नाही की *आरोपीने सांगीतले की सदर साठा हा त्याच्या मालकीचा असून विक्रीकरीता साठवणून करीत होतो.* कोणत्याही दस्तऐवजामध्ये किंवा माझ्या बयानामध्ये ही बाब नमूद केलेली नाही की *पांढ–या दोरीने बांधून, सदर भागावर डिंकाने चिटकविले, त्याची दोन्ही टोके आतील बाजूस दुमडून डिंकाने चिटकविली, त्यानंतर सदर नमूणा भाग पांढ–या दो–याने उभा–आडवा बांधून* ***लाखेच्या व पितळी मुद्रेच्या*** *सहाय्याने चार सिल केले.* साक्षीदार स्वतः सांगतात की त्यांनी सिल केले होते. वरील बाबी माझ्या बयानात जश्याच्या तश्या का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणामध्ये फिर्याद सक्षम न्यायालयामध्ये दाखल करण्याकरीता मी माझ्या वरिष्ठांकडे मंजुरी मिळण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता व तो प्रस्ताव दिनांक २७/०५/२०२४ रोजी मी सादर केला होता. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २७/०५/२०२४ च्या पूर्वी मी पोलीस स्टेशनला कैफियत दिली होती. या प्रकरणामध्ये मंजुरी आदेश मला दिनांक २१/०६/२०२४ रोजी प्राप्त झाला. त्या मंजुरी आदेशाप्रमाणे मी सक्षम न्यायालयामध्ये फिर्याद दाखल केली नाही.

**प्रश्न–** मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतर तुम्ही न्यायालयामध्ये फिर्याद का दाखल केली नाही ?
**उत्तर–** पोलीस स्टेशनला मी कैफियत दिली होती व त्यानूसार न्यायालयामध्ये प्रकरणा चालू होते. Double Jeopardy होवू नये म्हणून मी तशी फिर्याद न्यायालयामध्ये दाखल केली नाही.

१४. हे म्हणणे खरे आहे की मी सक्षम अधिका–यांना मंजुरी आदेश मिळण्यासाठीचा प्रस्ताव पाठवण्याअगोदरच या प्रकरणामध्ये दिनांक १/०१/२०२४ रोजी आरोपीच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या विरोधात दोषारोपपत्र दाखल झाले हे मला माहित असतांना सुध्दा, मी मंजुरी आदेश मिळण्याचा प्रस्ताव पाठविला होता. हे म्हणणे खरे आहे की जोपर्यंत सक्षम अधिका–यांची मंजुरी येत नाही तो पर्यंत मला न्यायालयामध्ये फिर्याद दाखल करता येत नाही.

१५. तथाकथित व्यक्तीला नमूणे घेण्याचा उददेश मी सांगीतला होता. नमूणे घेण्याबाबत नोटिस देणे आवश्यक नाही. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणातील तथाकथित माल नेमका कोठून जप्त करण्यात आला याची मी शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की आरोपीकडून माल जप्त करण्यात आला होता व त्याबाबतचा पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांच्या सांगण्यावरुन मी कैफियत दिली व आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की तथाकथित जप्त मालाचा आरोपीसोबत कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

दिनांक - १७/१२/२०२५

(पि.एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.